# २ वर्षांत भुयारी मेट्रोतून प्रवास

## २०२४ मध्ये काम पूर्ण होण्याचा मुंबई मेट्रो कॉर्पोरेशनचा दावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या देशातील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रो मार्ग ३ च्या आरेमधील कारशेडवरून वादावादी सुरू असतानाच दुसरीकडे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने या मार्गावरील मेट्रो ट्रेनच्या चाचणीची तयारी सुरू केली आहे आणि त्यानुसार मरोळ मरोशी येथे होणाऱ्या चाचणीसाठीचे कोच आंध्र प्रदेशहून मुंबईला रवाना झाले असतानाच कार डेपोचे काम पूर्ण करून सीप्झ ते बी.के.सी.पर्यंतचा पहिला टप्पा २०२४ दरम्यान सुरू होईल, असा दावा कॉर्पोरेशन केला आहे. त्यामुळे पुढच्या दोन वर्षांत मुंबईकरांचा प्रवास भुयारी मेट्रोतूनही होण्याची शक्यता आहे.

भुयारी मेट्रो ट्रेनची प्रारंभिक डिझाइन चाचणी करण्याच्या अनुषंगाने आरे डेपो बाहेर सरीपुतनगर

**■ ३ किमी लांबीच्या ट्रॅकवर चाचण्या**

मरोळ मरोशी मार्ग, सारीपुत नगराजवळील रॅम्पपासून मरोळ नाका मेट्रो स्थानाकापर्यंतच्या तीन किलोमीटर लांबीच्या ट्रॅकवर प्रोटोटाइप ट्रेनच्या चाचण्या होणार आहेत. येथेच उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या सुविधेत ट्रेन पार्क करण्यात येणार आहे.

येथील रॅम्पनजीक ट्रेनचे डबे उतरवून घेणे, त्यांची जुळवणी करणे यासाठी तात्पुरती सुविधा निर्माण करण्यात आली आहे. ही सुविधा मरोळ मरोशी मार्गाजवळील बोगद्याच्या तोंडाशी आहे. आठ डब्यांची एक ट्रेन आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथे तयार करण्यात आली आहे. या ट्रेनचे लवकरच मुंबईत आगमन होत आहे. याच मेट्रो ट्रेनच्या प्रारंभिक डिझाइन चाचण्या आता सुरू होणार आहेत.



१ २१ जुलै २०२२ च्या आदेशान्वये राज्य सरकारने २९ नोव्हेंबर २०१९चे आदेश रद्दबातल ठरवले आणि आरे येथील मेट्रो कारशेडचे काम पुन्हा सुरू करण्यास मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला आदेश दिले.

२ त्यानुसार डेपोमध्ये प्राथमिक कामे सुरु करण्यात आली असून, त्यामध्ये मुख्यत: साफसफाई आणि जागा समांतरीकरणाचे काम समाविष्ट आहे.

३ डेपोचे मुख्य काम सुरु करण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ यांची उपलब्धता करून देण्याचे काम कंत्राटदारांनी सुरु केले आहे.

४ सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय आणि राज्य सरकारच्या सर्व आदेशाचे पालन करुन हे सर्व काम सुरु आहे.